REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १८ डिसेंबर, १९४० | अंक ५०

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

## 'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगांचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
६२३ ए, सदाशिव, पुणें २.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

## अशक्ततेवर

# रक्तवर्धक

## वापरा.

सर्वत्र मिळतें.

—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

## आयुर्वेद रसशाळा
## पुणें, लि. पुणें ४.

## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.

## विविध माहिती

### नवीन ऑर्डरी घेण्याचें बंद केलें

ग्रेट ब्रिटनमध्यें दिलेल्या पोलादाचे मालाच्या ऑर्डरी पुऱ्या करतां आल्या तरी नवीन ऑर्डरी घेणें शक्य होणार नाहीं, कारण युद्धविषयक ऑर्डरी आधीं हातीं घेणें जरूर आहे, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

### चीनला कर्ज

ग्रेटब्रिटननें चीनला १५ कोटि रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे.

### मध्यवर्ती असेंब्लीचें अधिवेशन

मध्यवर्ती असेंब्लीच्या बजेटाचे अधिवेशनास ११ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होईल. असेंब्लीस १९ फेब्रुवारी रोजीं रेल्वे बजेट सादर करण्यांत येईल व २८ फेब्रुवारी रोजीं मध्यवर्ती बजेट तिचेपुढें मांडलें जाईल.

### लॉर्ड लोदिअन ह्यांचा मृत्यु

ग्रेट ब्रिटनचे वॉशिंग्टन (अमेरिका) येथील वकील, लॉर्ड लोदिअन, हे ता. १२ रोजीं मृत्यु पावले. मृत्यूची बातमी प्रथम अमेरिकेच्या अध्यक्षास कळविणें इष्ट असल्यामुळें, ती लंडनला पोंचण्यास थोडा विलंब लागला.

### औद्योगिक परिषद

हिंदुस्थान सरकारतर्फे भरविण्यांत येणाऱ्या औद्योगिक परिषदेस लखनौ येथें तां. १६ रोजीं प्रारंभ होईल. दिल्ली येथें एक औद्योगिक प्रदर्शन कायमचें चालू ठेवणें, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथें व्यापारी शिष्टमंडळें पाठविणें, माल खरेदी करण्याच्या सरकारी धोरणाचा लहान व मध्यम आकाराच्या धंद्यास कसा उपयोग होऊं शकेल हें पहाणें, संरक्षक जकातींच्या धोरणाचा फेरविचार, इत्यादि प्रश्न परिषदेंत चर्चिले जातील.

### चीन व रशिया ह्यांमधील व्यापारी करार

चीन व रशिया ह्यांचेमध्यें व्यापारी करार झाला आहे, त्याचे अन्वयें चीन रशियाला १९४१ मध्यें २½ कोटि रुपये किंमतीचा चहा पुरविणार आहे.

### पुण्याची युद्धास मदत

वॉर गिफ्ट्स फंडाची पुणें जिल्ह्याची रकम एक लक्ष रुपयांचेवर गेली आहे. डिफेन्स बॉंड्समध्यें ८ लक्ष २७ हजार, बिनव्याज बॉंड्समध्यें १ लक्ष ९५ हजार आणि डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांत ३ लक्ष ९ हजार ह्याप्रमाणें रकमा ह्या जिल्ह्यांत नोव्हेंबर २० अखेर गुंतलेल्या आहेत.

### नाविक दलांत ७% हिंदू

"हिंदी नाविक दलांतील लोकांपैकीं सुमारें ७% हिंदू व ९९% मुसलमान आहेत. मुख्य भरती पंजाबांतील आहे. नाविक दलांत प्रवेश मिळविण्यास हिंदू लोक फारसे उत्सुक नसतात. परंतु ही परिस्थिति हळुहळू पालटत आहे." डिफेन्स सेक्रेटरींनीं वरील माहिती असेंब्लींत दिली.

### बादशहांचा वाढदिवस

ग्रेट ब्रिटनचे राजे, सहावे जॉर्ज, ह्यांनीं आपला ४५ वा वाढदिवस गेल्या शनिवारीं साजरा केला.

### सिमेंट कंपन्यांमधील स्पर्धा थांबणार

असोसिएटेड सिमेंट व डालमिया सिमेंट कंपन्यांमध्यें गेलीं २½ वर्षें तीव्र स्पर्धा चालू होती, त्यामुळें सिमेंटची किंमत खालीं जाऊन ती उभयपक्षास नुकसानकारक झाली. प्रत्येकाच्या उत्पादक शक्तीचे प्रमाणांत त्याचें सिमेंट विकण्यांत यावें, असें आतां ठरलें आहे. विक्रीची व्यवस्था दोघांच्या सहकार्यानेंच केली जाणार आहे.

### अल्युमिनिअमच्या धंद्यास संरक्षण

हिंदुस्थानांत अल्युमिनिअमचें उत्पादन सुरू होणें युद्धाचे दृष्टीनें अत्यंत महत्वाचें असल्याकारणानें, ज्यांना तें हातीं घेण्याचें असेल, त्यांना सरकारनें संरक्षण देण्याचें आश्वासन दिलें आहे. युद्धसमाप्तीनंतरहि त्यांना आपला धंदा चालू ठेवतां यावा, ह्यासाठीं विदेशी अल्युमिनिअमची त्यांचेशीं अनिष्ट स्पर्धा होणार नाहीं एवढें संरक्षण सरकार त्यांस चालू ठेवील.

### पंजाबमध्यें मालमत्तेवर कर

शहरांतील इमारतींच्या व जमिनींच्या वार्षिक भाड्याचे रकमेवर कमाल २०% दरानें कर बसविणारें बिल पंजाब असेंब्लीनें मंजूर केलें. युद्धाप्रीत्यर्थ ५०% जादा पट्टी बसविण्याचा अधिकारहि बिलानें सरकारास दिला आहे. लाहोर व सिमला येथें ज्या मालमत्तेचें वार्षिक भाड्याचें उत्पन्न ३०० रुपयांपेक्षा कमी आहे अशा मालमत्तेस कराची माफी आहे. इतर ठिकाणीं कर लागू होण्यास मालमत्तेचें वार्षिक भाडें किमान २४० रुपये पाहिजे.

### जर्मनीचे हमरस्ते

जर्मनीमध्यें प्रचंड रुंदीचे कॉंक्रीटचे ४०० हमरस्ते युद्धापूर्वी तयार करण्यांत आले, त्यांचा उपयोग मार्याचीं ठिकाणें ओळखण्यासाठीं ब्रिटिश वैमानिकांस आतां उत्कृष्ट होत आहे. हे रस्ते रात्रीं वरून आकाशांतून सहज ओळखतां येतात व त्या रस्त्यांच्या अनुरोधानें मोठीं शहरें चटकन सांपडतात.

### १० इंच लांबीचें पोस्टाचें तिकीट

चीनमध्यें १० इंच लांबीचें व १½ इंच रुंदीचें पोस्टाचें तिकीट चालू आहे. पोस्टांतील कारकुनास पत्र व हें तिकीट दिलें, म्हणजे तो त्याचा २ इंच तुकडा फाडून घेतो, व उरलेलें तिकीट व पत्र परत देतो. राहिलेलें ८ इंची तिकीट पत्रास चिकटवावयाचें असतें. इष्ट त्या ठिकाणीं पत्र गेलें, म्हणजे तेथील पोस्टांत २ इंचाचा तुकडा फाडून घेण्यांत येतो, तो तेथेंच ठेवला जातो व आणखी दोन इंचाचा तुकडा मूळ ऑफीसाकडे पत्राची पोंच म्हणून पाठविला जातो. अखेर, मालकास पत्र मिळण्याचे वेळेस पत्रावर ४ इंच लांबीचा तिकिटाचा तुकडा उरतो.

### वस्तऱ्याची ब्लेड

आपण सकाळीं दाढी करतो त्या वेळीं वस्तरा १ लक्ष ते २½ लक्ष केस कापतो. सेकंदास २० ते ४० फूट ह्या वेगानें वस्तऱ्याची ब्लेड फिरते, म्हणजे केस कापण्यास प्रत्यक्ष वेळ असा १० सेकंदच लागतो. प्रत्येक ब्लेड १० वेळ दाढी करण्यास पुरते, ह्या हिशेबानें ब्लेडचें उपयुक्त आयुष्य १⅔ मिनिटेंच भरतें.

### बंदुकीच्या गोळीचा वेग

बंदुकीच्या गोळीस कमाल वेग बंदूक सोडल्यापासून ७५० फुटांवर प्राप्त होतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६२६ | कारखाने व त्यांचे उत्पादन–आयातीवरील करांचें उत्पन्न–एक्साइज ड्यूटीचें उत्पन्न–मुंबई प्रांतांतील साखर कारखाने–उसाच्या पिकाचा अंदाज–इंडियन शुगर सिं. | |
| २ इंग्लंडला अमेरिकेचें सांपत्तिक सहाय | ६२७ | ५ बृहन्महाराष्ट्र शु. सिं. च्या प्रगतीचा इतिहास | ६३१ |
| ३ स्फुट-विचार | ६२८ | ६ साखरेच्या धंद्यांतील अडचणी | ६३० |
| ताग्याच्या विक्रीची योजना–डॉलर्सच्या बचतीचें महत्व–युद्धाची उत्तेजनकारक वार्ता–युद्धविषयक धोक्याचा विमा | | ७ अमेरिकेंत हिंदी मालाचा उठाव | ६३३ |
| ४ हिंदी साखरेचा धंदा | ६२९ | ८ निवडक बाजारभाव | ६३४ |
| साखरेचें जागतिक उत्पादन व त्याचा खप–दर माणशी खप–हिंदी कारखान्यांची प्रगति–हिंदी | | | |


# अर्थ

बुधवार, ता. १८ डिसेंबर, १९४०

## इंग्लंडला अमेरिकेचें सांपत्तिक सहाय

चालू युद्धांत इंग्लंडला अमेरिकेकडून निरनिराळ्या स्वरूपांत वाढतें सहाय मिळत आहे, त्याचें महत्त्व किती आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. युद्धांत लोकशाहीचा विजय होण्यांत अमेरिकन राज्यघटनेचें संरक्षण आहे ह्याची जाणीव अमेरिकन जनतेस आहे. तसेंच, राजकीय सत्तेच्या अभिलाषानें प्रेरित झालेल्या हिटलरशाहीचें पुढें पडणारें प्रत्येक पाऊल स्वतःच्या स्वातंत्र्यावर येणाऱ्या संकटाचें चिन्ह होय हेंहि ती जनता जाणत आहे. तसेंच, अमेरिकेच्या संरक्षणार्थ जर्मनीच्या जपानी दोस्तावर नजर ठेवण्याची आवश्यकता अमेरिकन मुत्सद्यांस पटली आहे. प्रत्यक्ष युद्धांत न पडतां तें यशस्वी होण्यास इंग्लंडला सर्व प्रकारच्या सवलती देणें हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचें रहस्य आहे आणि तिसऱ्यांदा त्यांची प्रेसिडेंटच्या पदावर नेमणूक करून अमेरिकन जनतेनें त्यांच्या धोरणास पाठिंबा दिलेला आहे. लढाऊ विमानांचा आणि इतर सामुग्रीचा पुरवठा अमेरिकेमधून इंग्लंडला सारखा होत आहे. इंग्लंडच्या मदतीसाठी अमेरिकन कारखान्यांचा विस्तार झाला आहे आणि होत आहे. अमेरिकेकडून घेतलेल्या मालाची किंमत रोखीनें देण्याची व्यवस्था इंग्लंडनें आजपर्यंत चालू ठेवली आहे. युद्धाप्रीत्यर्थ इंग्लंडचे पंधरा कोटि रुपये प्रत्यही खर्च होत आहेत. असल्या अवाढव्य खर्चाची तजवीज करण्याचें सांपत्तिक सामर्थ्य इंग्लंडमध्यें आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेला स्वार्थत्याग करण्याची ब्रिटिश जनतेची पूर्ण तयारी आहे. परंतु आतां अवघड प्रश्न उपस्थित झाला आहे, तो इंग्लंडनें अमेरिकेच्या देण्याची भरपाई करावयाची तिच्या पद्धतीविषयींचा होय. शांततेच्या काळांत दोन राष्ट्रांचें परस्पर देणेंघेणें निघतें त्याची फेड आयात निर्गत व्यापाराच्या वजावाटीनें करण्यांत येऊन बाकी देणें-घेणें उरल्यास त्याच्या किंमतीच्या सोन्याचा विनिमय करून भागवलें जातें. युद्धामुळें अमेरिकेकडून घेण्याच्या रकमेपेक्षां कितीतरी अधिक देणेंच इंग्लंडचें होत आहे. ह्या फाजील देण्याची भरपाई कशी करावी हा व्यावहारिक प्रश्न सध्या अमेरिका व इंग्लंड ह्यांचें पुढें येऊन पडला आहे.

इंग्लंडला हरतऱ्हेनें मदत करण्याची अमेरिकेची इच्छा आणि अमेरिकेच्या देण्याची भरपाई करण्याचा इंग्लंडचा मनोदय ह्या गोष्टी स्पष्ट असल्यानें देण्या-घेण्याच्या वजावाटीची व्यावहारिक अडचण दूर करण्याचें कार्य ब्रिटिश व अमेरिकन तज्ञ ह्यांनीं हातीं घेतलें असून त्या संबंधांतल्या वाटाघाटी सध्या चालू झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय देण्याची भरपाई करण्याचे तीन मुख्य मार्ग आहेत. (१) पहिला, देण्याच्या रकमेइतकें सोनें देणेंकऱ्याच्या स्वाधीन करणें हा होय. एका राष्ट्राचें चलन दुसऱ्या राष्ट्रांत कायदेशीर रीतीनें चालत नसल्यानें आणि सोन्यास सर्वत्र सारखीच मागणी व किंमत असल्यानें हा घोपटमार्ग शक्य तोंवर स्वीकारण्यांत येतो. पण राष्ट्रांच्या सुवर्णसंग्रहास मर्यादा असते आणि विशेषतः युद्धकाळांत लढाऊ खर्च प्रचंड प्रमाणावर करणाऱ्या राष्ट्रांजवळ शिलकी सोनें फारसें असणें शक्य नाहीं. युरोपांतलें बहुतेक सोनें व्यापाराच्या देण्याच्या ओघांत अगोदरच अमेरिकेकडे गेलें आहे. ह्या स्थितींत इंग्लंडला युद्धाच्या दुसऱ्या वर्षांत अमेरिकेस सोनें पाठवतां येणार नाहीं, हें उघड आहे. (२) घेणेकरी राष्ट्रांतले रोखे व मंडळ्यांचे भाग देणेंकरी राष्ट्रांतील लोकांच्या मालकीचे असल्यास त्यांचेवरील हक्काच्या मोबदल्यांत देणें भागवण्याचा दुसरा मार्ग आहे. इंग्लंडनें ह्या मार्गाचा अवलंब केलेला आहे आणि ब्रिटिश सरकारनें स्वतःच्या नागरिकांकडून अमेरिकन रोखे घेण्याची व्यवस्था अगोदरच करून ठेवली आहे. इंग्लंडमधील नागरिकांस अमेरिकन रोख्यांचे ऐवजी त्यांच्या किंमतीचे ब्रिटिश रोखे मिळाले असतां त्यांचें काम भागण्यासारखें आहे आणि ह्या पद्धतीनें प्रजा व सरकार ह्या दोघांचाहि कार्यभाग सहज साधतो. (३) देणें भागवण्याचे वरील दोन्ही भाग उपलब्ध नसल्यास देणेंकरी राष्ट्रास घेणेकरी राष्ट्रानें घेण्याच्या रकमेइतकें कर्ज देणें हा तिसरा मार्ग आहे. गेल्या महायुद्धांत फ्रान्स व इंग्लंड ह्या राष्ट्रांस या मार्गाचा अवलंब करावा लागला होता आणि त्यांचें अमेरिकेचें फेडावयाचें कर्ज अंशतः अजूनहि शिल्लक आहे.

इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य ह्यांचें सांपत्तिक सामर्थ्य प्रचंड आहे हें अमेरिकेस माहीत आहे आणि वर वर्णिलेल्या दुसऱ्या पद्धतीस अजून बराच वावहि आहे. परंतु आतां दीर्घ मुदतीची आणि दूर दृष्टीची तयारी करावयाची असल्यानें तिसऱ्या व शेवटच्या मार्गाचा विचार अगाऊ वेळींच होणें अगत्याचें झालें आहे. तसा प्रसंग आल्यास अमेरिका इंग्लंडला कर्ज देईल असें आश्वासन मिळाल्यास दोन्ही राष्ट्रांत परस्पर-विश्वासाचें वातावरण निर्माण होऊन लढाऊ सामानाच्या पुरवठ्याची योजना कार्यक्षम रीतीनें करतां येईल आणि अमेरिकन कारखानदारांस उत्पादनाचा विस्तार करण्यास हुरूप येईल. ब्रिटनला द्यावयाच्या अमेरिकन कर्जास भक्कम तारण मिळण्याविषयींची कल्पना पुढें मांडली जात आहे, ती अमेरिकन जनतेच्या दृष्टीनें अयोग्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. इंग्लंडजवळ युरोपच्या बाहेर अमेरिकेस मान्य होईल असें भरपूर तारण आहे आणि जरूर पडल्यास त्याचा उपयोग करण्याची तयारी ठेवली जाईल असा रंग दिसत आहे. कांहीं झालें तरी तडजोडीनें व मित्रत्वाच्या भूमिकेवर हा प्रश्न सोडवण्याची दोन्ही राष्ट्रांची तयारी आहे ह्यांत संशय नाहीं. त्याच-प्रमाणें वाढत्या व विस्तृत प्रमाणावर लढाऊ तयारी करण्याचा इंग्लंडचा प्रयत्न चालला असून अमेरिकेचें त्यास पूर्ण पाठबळ आहे हेंहि निर्विवाद आहे. सध्या हीच गोष्ट अत्यंत उत्तेजनकारक आहे. सर फ्रेडरिक फिलिप्स हे ब्रिटिश सरकारच्या वतीनें ह्या कामगिरीवर अमेरिकेमध्यें आहेत आणि अमेरिकन अधिकाऱ्यांशीं त्यांचीं बोलणीं चालली आहेत.

# स्फुट विचार

## तागाच्या विक्रीची योजना

इतर हिंदी पिकांप्रमाणें तागासहि बाहेरची मागणी कमी झाल्यामुळें त्याच्या भावामध्यें घट व चलबिचल उत्पन्न झाली आहे. बंगालमध्यें तागाचें पीक शेतकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें असून तागाच्या गिरण्यांचा धंदाहि त्याचेवर सर्वस्वी अवलंबून आहे. तागाच्या किंमती उतरल्या कारणानें त्या पिकाचें क्षेत्र मर्यादित करण्याविषयींच्या सूचनेचा विचार झाला. पण त्याचे ऐवजी बंगाली शेतकऱ्यांनीं दुसरें कोणतें पीक करावें हें ठरवणें कठिण असल्याचें दिसून आलें. तागाच्या गिरण्यांच्या मंडळानें ह्या प्रश्नाचा विचार करून त्यासंबंधांत योजना सुचव-ण्याचें ठरवलें. ह्या सर्व विषयाचा विचार करण्यासाठी दिल्ली येथें एक परिषद् नुकतीच भरली होती आणि तीमध्यें हिंदुस्थान सरकार, तागाच्या पिकाशीं संबंध असलेल्या प्रांतांचीं सरकारें आणि तागाच्या गिरण्या ह्या सर्वांच्या प्रतिनि-धींनीं विचार-विनिमय केला. त्यांत झालेल्या निर्णयावरून असें दिसतें कीं, येत्या हंगामांत ठराविक किंमतीनें आणि ठराविक प्रमाणांत तागाची खरेदी गिरण्यांनीं करावयाची असून त्यांत शिल्लक राहिल्यास त्या मालाच्या खरेदी-विक्रीची जबाबदारी हिंदु-स्थान सरकारनें घ्यावयाची आहे. सरकारच्या प्रत्यक्ष मदती-वांचून तागाच्या पिकाच्या सारखे महत्त्वाचे प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटूं शकत नाहींत हें प्रस्तुत उदाहरणावरून सिद्ध झालें आहे. तागाची लागवड मर्यादित व्हावी त्या संबंधींहि बंगालचें सरकार प्रयत्न करीत आहे.

## डॉलर्सच्या बचतीचें महत्त्व

युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याच्या किंमतीची भरपाई इंग्लंडनें अमे-रिकेस कशी करावयाची ह्या संबंधानें सध्या चर्चा चालू आहे, तिच्या मुळाशीं असलेल्या तात्त्विक व व्यावहारिक प्रश्नांचें त्रोटक विवेचन आम्हीं आजच्या अग्रलेखांत केलें आहे. "रोकड देऊन माल घेऊन जा" ह्या तत्त्वावर अमेरिका ग्रेट ब्रिटनला माल पुरवीत आहे. त्यास अनुसरून रोकडीचा व्यवहार होऊं न शक-ल्यास त्यावर काय तोड काढावी असा आज प्रश्न उपस्थित झाला आहे. अमेरिकन जनता इंग्लंडला सर्व प्रकारचें सहाय देण्यास सर्वस्वी अनुकूल असल्यानें मार्गांत येणाऱ्या कायद्याच्या व इतर अडचणी दोन बाजूंच्या विचारानें दूर केल्या जातील ह्यांत शंका नाहीं. अमेरिकेनें हॉलंडला कर्ज द्यावें आणि इंग्लंडनें तें हॉलंडकडून घ्यावें आणि अशा रीतीनें कायद्याची आडकाठी दूर करावी ह्या अर्थाची सूचना एका अमेरिकन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आहे तिचें रहस्य वरील विवेचनावरून ध्यानांत येण्या-सारखें आहे. चीनला एक कोटि पौंडांचें कर्ज देण्याचें इंग्लंडनें ठरवलें आहे, त्याची माहिती कॉमन्स सभेंत मि. बटलर ह्यांनीं दिली तीवरून आंतरराष्ट्रीय देण्याची भरपाई होण्यांत येणाऱ्या अडचणींवर चांगला प्रकाश पडतो. वरील एक कोटि पौंडांपैकीं निम्मी रक्कम पौंड स्टर्लिंग हें चलन जेथें चालू आहे तेथेंच माल खरेदी करण्यासाठी वापरली पाहिजे अशी अट चीनवर घालण्यांत आली आहे. डॉलर्सची बचत करून अमेरिकेचें देणें इंग्लंडला भागवावयाचें असल्यानें चीनला त्या देशाकडून डॉलर्समध्यें कर्ज मिळणें शक्य नाहीं. डॉलर्समधील हुंड्यांची बचत आणि स्टर्लिंगमधील हुंड्यांचा पुरवठा हेंच धोरण इंग्लंडला स्वीकारणें प्राप्त आहे.

## युद्धाची उत्तेजनकारक वार्ता

आफ्रिकेमध्यें मुसोलिनीनें एक मोठी फौज पाठवून आपल्या लिबियन मुलखामधून इजिप्तच्या बाजूस निर्जन वालुकामय प्रदे-शांत ठाणें दिलें होतें. इजिप्त, सुदान व सुएझचा कालवा ग्रास घेण्याचा त्याचा बेत होता आणि ब्रिटिशांचें लक्ष दुसरीकडे वेधून टाकण्याच्या उद्देशानें त्यानें ग्रीसवर स्वारी केली होती. इटलीच्या ह्या लढाऊ योजनेचा डोलारा आतां कोसळला आहे. ग्रीक फौजांनीं इटालियन सैन्यास आल्बेनियामध्यें मागें रेटीत नेण्याचा क्रम चालू ठेवला आहे. इटालिअन सैन्याचा पराभव होऊन तें सारखी पीछेहाट करीत आहे, इटालिअन शौर्याविषयींच्या मुसोलिनीच्या वल्गना फोल ठरल्या आहेत आणि त्याची सर्व जगांत नाचक्की झाली आहे. आफ्रिकेमध्यें ह्याच परिस्थितींत ब्रिटिश सेनानींनीं इटालिअन फौजेवर चाल करून सिदिबराणी ह्या महत्त्वाच्या व बंदोबस्ताच्या ठाण्यामधून तिची हकालपट्टी केली आहे. ब्रिटिशांचें आरमार, विमानदल व फौज ह्यांनीं एकवटून चढवलेला हल्ला इटालिअन लष्करी अधिकाऱ्यांच्या कल्पना-क्षेत्राच्या बाहेर होता आणि ह्यामुळें ते गैरसावध होते. इटालिअन फौजांची दाणादाण होऊन त्यांचे कित्येक मुख्याधिकारी, शिपाई व लढाऊ सामुग्री हीं ब्रिटि-शांच्या हातीं लागलीं आहेत. हजारों शिपाई कैदी झाले आहेत आणि मागें हटणाऱ्या फौजेचा पाठलाग ब्रिटिश सैन्य करीत आहे. आफ्रिकेंतील इटालिअन पराभवाचा दीर्घगामी परिणाम युद्धाच्या भवितव्यावर झाल्यावांचून रहाणार नाहीं. दारूगोळ्याच्या कार-खान्यांतील कामगारांस उद्देशून केलेल्या आपल्या भाषणांत हिटलरनें युद्ध निकरानें अखेरपर्यंत चालू ठेवण्याचा कृतनिश्चय जाहीर केला आहे आणि ह्याच्या पुढचे त्याचे डावपेंच काय आहेत, ह्याचा अंदाज करणें अवघड आहे. इटालिअन पराभवानें तो थोडासा नाउमेद झालाच असला पाहिजे असें त्याच्या भाषणावरून दिसतें. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या देशांस ह्याच योगानें उत्तेजन आल्या-वांचून रहाणार नाहीं.

## युद्धविषयक धोक्याचा विमा

हिंदुस्थान सरकारनें युद्धविषयक धोक्याचा विमा उतरवि-ण्याची सक्तीची योजना १ नोव्हेंबर, १९४० पासून अंमलांत आणली. २० हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या मालाचा साठा असणाऱ्या, जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणच्या व्यापाऱ्यांस ह्या साठ्याचा वरील योजनेप्रमाणें सक्तीनें विमा उतरावा लागतो. दर-महा दर शेकडा अर्धा आणा, असा हप्त्याचा दर ठरविण्यांत आला होता व तो दर तीन महिने अंमलांत राहून परिस्थितीस अनुसरून आवश्यक वाटल्यास बदलण्यांत येईल, असें त्यावेळीं जाहीर करण्यांत आलें होतें. ३१ मार्च, १९४१ अखेर हप्त्याचा तोच दर कायम राहील, असें सरकारनें आतां प्रसिद्ध केलें आहे. सक्तीच्या विम्याचे योजनेंत सुमारें ५ अब्ज रुपयांचा माल येईल, अशी अपेक्षा होती, परंतु अनेक व्यापारी अद्याप सक्तीखालीं येणाऱ्या आपल्या मालाचा विमा उतरत नाहींत, असें आढळून आलें आहे. विम्याचें क्षेत्र जेवढें व्यापक होईल, त्या मानानें प्रत्यक्ष धोक्याचें प्रमाण कमी होऊन त्यास अल्प दराचे हप्ते पुरतील हें उघड आहे. कायद्याप्रमाणें येणारी जबाबदारी आपण टाळणें म्हणजे इतरांवरील बोजा वाढविणें होय, हें सर्वांनीं लक्षांत घेतलें पाहिजे.

# हिंदी साखरेचा धंदा

( १ )

### साखरेचें जागतिक उत्पादन व त्याचा खप
( १९३८–३९ )

| | उत्पादन ( टन ) | खप ( टन ) |
|---|---|---|
| अमेरिका | २०,९७,००० | ५९,६५,००० |
| एकूण उत्तर अमेरिका | ८०,६५,००० | ७१,७८,००० |
| एकूण दक्षिण अमेरिका | २२,४८,००० | १८,७५,००० |
| जर्मनी | २१,१४,००० | २०,५४,००० |
| रशिया | २२,६०,००० | २२,८०,००० |
| ग्रेटब्रिटन | ४,१४,००० | २३,४०,००० |
| एकूण युरोप | ८६,६९,००० | १,१४,९९,००० |
| हिंदुस्थान | ४०,९०,००० | ४२,९०,००० |
| जाव्हा | १५,००,००० | ११,९०,००० |
| एकूण रशिया | ८५,४८,००० | ७३,७२,००० |
| एकूण आफ्रिका | ११,८६,००० | ९,२४,००० |
| एकूण ऑस्ट्रेलिया | ७,९०,००० | ३,५८,००० |
| एकूण | २,६६,४२,००० | २,९३,२३,००० |

वरील जागतिक उत्पादनापैकीं १ कोटि, ८० लक्ष टन साखर उसाची असून १ कोटि, १० लक्ष टन साखर बीटाची आहे. युरोपांतील एकूण खप १ कोटि, १५ लक्ष टन असला तरी तेथील उत्पादन फक्त ८६३⁄४ लक्ष टनांचें आहे. जगांतील सर्व देशांत साखरेच्या उत्पादनाचे बाबतींत हिंदुस्थान अग्रेसर आहे. जागतिक उत्पादनाच्या १४% उत्पादन हिंदुस्थानांत होतें.

( २ )

### दर माणशीं खप

संयुक्त प्रांत आणि बिहार येथें हिंदुस्थानांतील साखरेच्या उत्पादनापैकीं सुमारें ८५% साखर तयार होते, परंतु देशांतील खपापैकीं फक्त १६% खप तेथें होतो. मुंबई प्रांतांतील साखरेचा खप तेथील उत्पादनाचे पेक्षां सुमारें चौपट आहे. १९३८–३९ मध्यें मुंबई प्रांतांतील कारखान्यांत ५२,३०० टन साखर तयार झाली. साखरेचा वार्षिक दरमाणशीं खप मुंबई प्रांतांत ८१⁄२ शेर आहे. त्याचे खालोखाल अनुक्रम बंगालचा लागतो. तेथें प्रत्येक मनुष्यास सालीना सरासरीनें ३१⁄२ शेर आहे. इतर प्रांतांतील खप ह्यापेक्षा कमी आहे.

जगांतील कांहीं प्रमुख देशांतील दरमाणशीं साखरेचा खप किती मोठा आहे, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| देश | दरमाणशीं वार्षिक खप ( शेर ) |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ५९ |
| ग्रेटब्रिटन | ५६ |
| अमेरिका | ५१ |
| जर्मनी | ३० |
| फ्रान्स | २८ |
| जपान | १३ |

( ३ )

### हिंदी कारखान्यांची प्रगति

| वर्ष | कारखान्यांची संख्या | गाळलेला ऊंस ( टन ) | तयार केलेली साखर ( टन ) |
|---|---|---|---|
| १९३१–३२ | ३२ | १७,८३,००० | १,५८,५८१ |
| १९३३–३४ | ११२ | ५१,५७,००० | ४,५३,९६५ |
| १९३६–३७ | १३७ | १,१६,८७,००० | ११,११,४०० |
| १९३८–३९ | १३९ | ७०,०४,८०० | ६,५०,८०० |
| १९३९–४० ( अंदाज ) | १४४ | ९३,००,००० | ८,५०,००० |

( ४ )

### हिंदी कारखाने व त्यांचें उत्पादन

वेगवेगळ्या प्रांतांत साखरकारखाने किती आहेत, त्यांत ऊंस किती गाळण्यांत आला, साखर किती तयार झाली व साखरेचा उतारा किती पडला, हें खालील तक्ता दर्शवितो. एकट्या संयुक्त प्रांतांत १३९ पैकीं ६९ कारखाने असून बिहारमध्यें ३२ कारखाने आहेत. मुंबई प्रांतांतील कारखान्यांमधील साखरेच्या उताराचें प्रमाण सबंद हिंदुस्थानाच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. इतर कोणत्याहि प्रांतांत इतका उतारा पडत नाहीं.

| प्रांत | चालू कारखाने | गाळलेला ऊंस (टन) | केलेली साखर (टन) | साखरेचा उतारा (%) |
|---|---|---|---|---|
| संयुक्तप्रांत | ६९ | ३५,०५,४०० | ३,२०,३०० | ९·१४ |
| बिहार | ३२ | १७,९५,३०० | १,६१,६०० | ९·०० |
| पंजाब व सिंध | ३ | ८७,१०० | ७,५०० | ८·६२ |
| मद्रास | ७ | २,४५,५०० | २३,००० | ९·३७ |
| मुंबई | ७ | ४,६३,२०० | ५२,३०० | ११·२९ |
| बंगाल | ८ | १,३१,१०० | ९,९०० | ७·५५ |
| ओरिसा | २ | ८,९०० | ७०० | ७·८७ |
| हिंदी संस्थानें | ११ | ७,६८,३०० | ७५,५०० | ९·८३ |
| एकूण(हिंदुस्थान) | १३९ | ७०,०४,८०० | ६,५०,८०० | ९·२९ |

( ५ )

### आयातीवरील कराचें उत्पन्न

साखरेच्या आयातीवरील कराचें उत्पन्न, आयात कमी होत चालल्यामुळें उतरूं लागलें आहे, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| वर्ष ( एप्रिल-मार्च ) | उत्पन्न ( रु. ) |
|---|---|
| १९३१–३२ | ७,९७,६३,००० |
| १९३३–३४ | ४,७२,०४,००० |
| १९३५–३६ | ३,२४,१६,००० |
| १९३७–३८ | २५,३३,००० |
| १९३८–३९ | ४५,२२,००० |
| १९३९–४०(सप्टेंबरअखेर) | २,९१,४५,००० |

(६)

## एक्साइज ड्यूटीचें उत्पन्न

१९३८–३९ मध्यें हिंदुस्थान सरकारास साखरेवरील एक्साईज ड्यूटींचे ४ कोटि, २३ लक्ष रुपये मिळाले. १९३४–३५ मध्यें ह्या ड्यूटीचें उत्पन्न फक्त १७½ लक्ष रुपये झालें होतें. तें हळुहळु वाढत गेलें. संस्थानांपैकी रामपूर संस्थानास सर्वांत अधिक ड्यूटी, म्हणजे १० लक्ष, ८७ हजार रुपये मिळाले. म्हैसूरला ८ लक्ष, ७४ हजार, फलटणला ३ लक्ष, ७१ हजार व कोल्हापूरला २ लक्ष, १५ हजार रुपये मिळाले. ह्या सर्व संस्थानांतील साखरेचा खप त्यांतील उत्पादनापेक्षा कमी आहे.

(७)

## मुंबई प्रांतांतील साखरकारखाने

(१९३८–३९)

| कारखान्याचें नांव | ठिकाण | जिल्हा | जवळचें रेल्वे स्टेशन | रोज किती ऊंस गाळतां येतो ? (टन) |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर शुगर मिल्स (मॅ. एजंटः—शिरगांवकर ब्रदर्स) | कोल्हापूर | कोल्हापूर संस्थान | कोल्हापूर | ४०० |
| सासवड माळी (मॅ. एजंट्स : लेव्ही लि.) | अकलूज | सोलापूर | पंढरपूर डिक्सळ | २००/२५० |
| बृहन्महाराष्ट्र (मॅ. एजंट्स : आगाशे आणि कं.) | बोरगांव | सोलापूर | पंढरपूर | २५० |
| फलटण (मॅ. डायरेक्टर : श्री. वा. श्री. आपटे) | पिंपळवाडी | फलटण | निरा | ५०० |
| कळंब शुगर वर्क्स (मॅ. एजंट्स : प्रिमियर कन्स्ट्रक्शन कं. लि.) | कळंब | पुणें | बारामती | १,००० |
| रावळगांव शुगर फार्म लि. (मॅ. एजंट्स : वालचंद आणि कं. लि.) | रावळगांव | नाशिक | मनमाड | ५०० |
| बेलापूर कं. लि. (मॅनेजर्स : मॅडी आणि कं. लि.) | हरिगांव | नाशिक | बेलापूर | ६५० |
| महाराष्ट्र शुगर मिल्स लि. (मॅ. एजंट्स : ब्रह्मणकर आणि कं. लि.) | टिळकनगर | अहमदनगर | बेलापूर | १,००० |
| बेलवंडी शुगर फार्म लि. (मॅ. एजंट्स : ब्रह्मणकर आणि कं. लि.) | बेलवंडी | अहमदनगर | बेलवंडी | २५०/३०० |
| गोदावरी शुगर मिल्स लि. (मॅ. एजंट्स : कोठक आणि कं.) | कान्हेगांव | अहमदनगर... | | ४००/५०० |
| गणदेवी शुगर वर्क्स अँड डिस्टिलरी कं. लि. | गणदेवी | बडोदें संस्थान | गणदेवी बिलिमोरिया | ९५० |

(८)

## उंसाच्या पिकाचा अंदाज

१९४०–४१ चा मोसम

१९४०–४१ च्या मोसमांत एकूण ४२ लक्ष, ४४ हजार एकर उंसाखाली आहेत, असा सरकारी अंदाज आहे. गेल्या मोसमामध्यें ३७ लक्ष ३१ हजार एकरांत ऊंस लावलेला होता. म्हणजे, उंसाच्या लागवडींत १४% वाढ झाली आहे. एकूण पिकापैकीं ५३·१% उंस संयुक्तप्रांतांत ११·९% पंजाबांत, १०·५% बिहारमध्यें, ७·८% बंगालमध्यें, व ३% मुंबई प्रांतांत आहे. खालील तक्त्यांत प्रत्येक प्रांतांतील लागवडीची तपशीलवार माहिती दिली आहे:—

| प्रांत | १९४०–४१ | १९३९–४० | वाढ अगर घट |
|---|---|---|---|
| | (१,००० ए.) | (१,००० ए.) | (१,००० ए.) |
| संयुक्तप्रांत | २,२९३ | २,०६२ | +२३१ |
| पंजाब | ४५४ | ४२९ | +२५ |
| बिहार | ५३० | ४५२ | +७८ |
| बंगाल | ३३३ | ३१९ | +१४ |
| मुंबई | १४१ | १२६ | +१५ |
| मद्रास | १४९ | १२३ | +२६ |
| सरहद्दप्रांत | ७९ | ७१ | +८ |
| आसाम | ४१ | ३६ | +५ |
| ओरिसा | ३५ | ३३ | +२ |
| मध्यप्रांत | ३२ | ३० | +२ |
| सिंध | ७ | ७ | |
| दिल्ली | १ | १ | |
| हैद्राबाद | ३८ | ३५ | +३ |
| भोपाळ | ८ | ५ | +३ |
| बडोदें | ३ | २ | +१ |
| एकूण | ४,२४४ | ३,७३१ | +५१३ |

(९)

## इंडियन शुगर सिंडिकेट

हिंदी साखरेच्या कारखानदार कंपन्यांची ही संस्था १९३७ सालीं स्थापन झाली, त्यावेळीं तिचे पटावर ९२ कारखाने होते. त्यांतील बहुतेक संयुक्त प्रांत व बिहार ह्यांमधीलच होते. १९३८ मध्यें ह्या प्रांतांनीं आपल्या हद्दींतील कारखान्यांस साखर करण्यासाठी लायसेन्स घेणें भाग पाडलें. ह्या लायसेन्समध्यें एक अशी अट आहे, की कारखाना इंडियन शुगर सिंडिकेटचा सभासद असला पाहिजे. साखरेच्या उठावाचें नियंत्रण करणाऱ्या सिंडिकेटला ह्या प्रातिक सरकारानें अशा रीतीनें मान्यता दिली. १९३८–३९ च्या मोसमांत १०८ कारखाने सिंडिकेटचे सभासद झाले. त्यापैकीं ७१ संयुक्त प्रांतांतील, व २४ बिहारमधील होते. सभासद कारखान्यांनीं १९३८–३९ मध्यें ९,५०,८०० टनांच्या एकूण हिंदी उत्पादनापैकी ४,९०,००० टन साखरेचें उत्पादन केलें. सिंडिकेटनें प्रत्येक कारखान्यानें साखर किती विकावयाची हें ठरवून दिलें व सिंडिकेटनें निश्चित केलेल्या दरानें अगर त्यापेक्षा अधिक दरानें कारखान्यांनीं ती विकली. ऊस गाळण्यास प्रत्येक कारखान्यानें केव्हां प्रारंभ करावा हें ठरवून देण्याचाहि सिंडिकेटनें प्रयत्न केला. महाराष्ट्रांतील कोल्हापूर, कळंब, रावळगांव, बेलापूर, व महाराष्ट्र शुगर मिल्स हे कारखाने सिंडिकेटचे सभासद आहेत.

# बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या प्रगतीचा इतिहास

( बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या प्रगतीच्या इतिहासांतील टप्प्यांची माहिती येथें दिली आहे, तिजवरून ह्या कंपनीचा उगम, तिच्या मार्गांतील अडचणी, तिला अखेर मिळालेलें यश, इत्यादींची कल्पना येईल. )

## कारखान्याची मूळ कल्पना

श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए. एलएल. बी., वकील, पुणें, व उपाध्यक्ष, भोर कायदेमंडळ, ह्यांनीं १९३४ मध्यें ९ पृष्ठांचें एक विनंतिपत्रक प्रसिद्ध करून महाराष्ट्रांत साखर कारखाना काढण्याच्या कल्पनेचा प्रथम प्रसार केला. ह्या पत्रकांतील उतारा येथें दिला आहे:—

"गेल्या पांच वर्षांतील जागतिक मंदीनें-शेतकऱ्यांची अत्यंत दैन्यावस्था झाली आहे. नोकरवर्गाला आपली नोकरी कायम टिकेल, अशी शाश्वति नाहीं व सुशिक्षित पदवीधरांना नोकऱ्या मिळत नाहींत. अशा स्थितींत महाराष्ट्राची उत्पादक शक्ति अंशतः तरी वाढावी व त्यायोगें सुशिक्षित व अशिक्षित यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें उपजीविकेचें साधन मिळावें, या हेतूनें "महाराष्ट्र शुगर सिंडिकेट" ची योजना आम्हीं आपल्यापुढें मांडीत आहोंत. साखरेच्या धंद्याला पंधरा वर्षेंपर्यंत संरक्षण मिळालें असल्यामुळें साखरेचा उपयुक्त व फायदेशीर धंदा महाराष्ट्र जनतेनें हातीं घेण्यासारखा आहे तो असाः—

"पुणें जिल्ह्यांत भोर संस्थानाला लागून भाटघर धरणाचें झालेलें प्रचंड काम सर्वत्र मशहूर आहेच, व त्यांतून निघालेला "नीरा राइट बँक" कॅनॉल हा जवळ जवळ पंढरपूरपर्यंत गेलेला आहे हे सर्वांस माहीत आहेच. सदरहू कालव्याखालीं सोलापूर जिल्ह्याचे हद्दींत भिजणारी सर्व जमीन विभागून त्यामध्यें प्रत्येकीं ५०० ते ६०० टनांचा एक असे साखरेचे सहा कारखाने काढतां येतील, असें मुंबई सरकारचे इरिगेशन खात्यानें त्या भागांत सहा गट पाडलेले आहेत. वरील सर्व गट पंढरपूर स्टेशन-पासून जास्तींत जास्त २९ मैल लांब आहेत. वरील गटांतील जमिनीस साखरेचे कारखानदारांशिवाय इतर लोकांना मुंबई सरकार पाणी देणार नाहीं असें वरील सर्व गटांत येणाऱ्या ५-५० गांवांत नोटिसा लावून कळल्यामुळें आणि वर वर्णन केलेल्या गटांचें क्षेत्रांत व आजूबाजूचे भागांत पावसाचें मान फारच कमी असल्यामुळें साखरेचे कंपनीस खंडानें जमिनी मिळणें अतिशय सोईचें झालें आहे. सर्वांत उत्तम जमिनीचा खंड १२ ते १३ रु. एकर आहे व वर वर्णन केलेल्या ६ गटांमध्यें प्रत्येक गटांत ७॥ ते १० हजार एकरपर्यंत चांगल्यापैकी जमीन आहे. वर वर्णन केल्याप्रमाणें ६०० टनांचा कारखाना एकदम काढावा असें ठरविल्यास त्यास फार मोठें भांडवल लागेल; परंतु हल्लींच्या कालमानपरिस्थितीचा विचार करतां एवढें मोठें भांडवल जमेल असें आम्हांस वाटत नाहीं. म्हणून आपणां सर्वांस झेपेल, व्यक्तिशः प्रत्येकास स्वतः व त्याचे मित्रमंडळींतर्फे कंपनीचे कामास मदत करतां येईल, अशी घटना आम्हीं जनतेच्या विचाराकरितां सादर करीत आहोंत."

## महाराष्ट्रीयांस विनंति

उभें करावें लागणारें भांडवल, त्यावरील अपेक्षित डिव्हिडंड, ऊंस-लावणीचा व गाळणीचा खर्च, मशिनरीची खरेदी व उभारणी, नफ्याचें प्रमाण, इत्यादींचा तपशील देऊन नंतर श्री. आगाशे ह्यांनीं खालीलप्रमाणें विनंति केली:—

"आजपर्यंतची साखरेच्या धंद्याची परिस्थिति पहातां तो धंदा केवळ श्रीमंत व भांडवलवाल्या मंडळींचाच झाला आहे, व त्यांत विशेषतः बंगाल, पंजाब, बिहार, ओरिसा व मुंबई येथील भांडवलवाल्यांनींच भांडवल गुंतविलें आहे. महाराष्ट्राच्या सुदैवानें वर वर्णन केल्याप्रमाणें नीरा राइट बँक कॅनॉलवर पाणी व जमीन या ऊंसाला लागणाऱ्या दोन आवश्यक गोष्टींचा योग जमून आला आहे, रेल्वे वर्ष-दोन वर्षांत होऊं पहात आहे, व साखरेच्या धंद्याला सरकारी संरक्षण मिळालेलें आहे. तेव्हां महाराष्ट्रानें साखरेचा धंदा ताबडतोब हातीं घेणें श्रेयस्कर आहे. संघशक्तीनें काय होऊं शकणार नाहीं? साखरेचा धंदा महाराष्ट्रानें हातीं घेतल्यास तो यशस्वी व किफायतशीर कसा होईल हें आम्हीं विस्तृतपणें आपणांपुढें मांडलें आहे. वरील साखरेच्या कारखान्यानें भागीदारांना नफा मिळेलच; शिवाय सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन हजार महाराष्ट्रीयांना त्यांच्या लायकीप्रमाणें कामधंदा मिळून आपली व आपल्या कुटुंबाची उपजीविका करितां येईल. वरील योजनेप्रमाणें पुढें पाऊल टाकणें किंवा न टाकणें हें जनतेच्या मदतीवर व संमतीवर रहाणारें आहे. निश्चयाचे बळावरच फळाची अपेक्षा आम्हीं करीत आहों. ही योजना साखरेच्या धंद्यांतील तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन व यशाची खात्री पटली म्हणून मांडली आहे. साखर हा प्रपंचांत नित्य लागणारा पदार्थ आहे. ॥ सहवीर्यं करवावहै ॥ अशी आपणांस आम्हीं विनंति करीत आहों."

## कंपनीची स्थापना

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ची स्थापना श्री. न. चिं. केळकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं २१ सप्टेंबर, १९३४ रोजीं झाली. कंपनीला व्यवहार सुरू करण्याची रजिस्ट्रारची परवानगी ११ जानेवारी, १९३५ रोजीं मिळाली व तिनें बियाण्यासाठीं ऊंस लावण्यास १५ जानेवारी १९३५ रोजीं प्रारंभ केला. प्रथम ७५ एकरांत ऊंस लावण्यांत आला, त्यांतील बियाणें पुढें १२०० एकरांस पुरलें. पहिल्या लागवडीच्या बियाण्यास प्रत्येक एकरीं ५३ रुपये पडले, परंतु पुढें लागणारें बियाणें कंपनीनें स्वतःच तयार केलें, त्यामुळें मोठी बचत झाली. कंपनीनें सुमारें १८२० एकर जमीन सरासरी ८ रु. ४ आ. एकरी खंडानें ३० वर्षांच्या करारानें घेतली, अशी माहिती स्टॅट्युटरी सभेंत सांगण्यांत आली. २३ जून, १९३५ अखेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ३६,९०३ रुपये होतें.

## मशिनरीसंबंधीं व्यवस्था

२७ ऑक्टोबर, १९३६ रोजीं कंपनीनें सरकारकडे अर्ज करून ३० वर्षे मुदतीपर्यंतच्या पाणी-पुरवठ्याचा करार पक्का करण्याविषयीं विनंति केली, ह्या संबंधांतील वाटाघाटींस बराच वेळ लागला. अखेर, सरकारचें १६ मार्च, १९३७ रोजीं उत्तर आलें. मध्यंतरीं, १९३६ च्या डिसेंबरांत डायरेक्टरांनीं वर्तमानपत्रांचें द्वारां जनतेस असें कळविलें, कीं सरकारी उत्तर हातीं येईपर्यंत शेअर मंजुरी करण्यांत येणार नाहीं व मशिनरी मागविली जाणार नाहीं. सरकारचें उत्तर येतांच, सिंडिकेटनें

मशिनरींची निवड करून स्कोडा कंपनीकडे ६ एप्रिल, १९३७ रोजीं ११,१०० पौंड किंमतीच्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिली. ह्या सर्व मशिनरीचें अंदाजें वजन ८०० टन इतकें होतें. मशिनरीच्या किंमतीचा पहिला एक हप्ता (२०%) ७ एप्रिल, १९३७ रोजीं देण्यांत आला. मशिनरी जसजशी येत गेली, तसतशी त्याची किंमत देण्यांत आली. मशिनरीचा पहिला हप्ता ऑक्टोबर, १९३७ मध्यें आला. मध्यंतरीं, श्री. न. चिं. केळकर ह्यांनीं संचालक मंडळावरील आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यांचे जागीं दिवाण बहाद्दूर एन. सी. लिमये ह्यांची नेमणूक करण्यांत आली व श्री. वि. न. उर्फ आण्णासाहेब वर्तक हे कंपनीचे चेअरमन झाले. ३० नोव्हेंबर, १९३७ असेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल २,८१,८०३ रुपये होतें व मुदतीच्या ठेवी १,०७,८५० रुपयांच्या होत्या. डिपॉझिटच्या रकमांत पुढें जलद वाढ होत गेली, त्यामुळें उंसाची लागवड वाढविण्यास अतिशय मदत झाली. सिंडिकेटला तिनें घेतलेल्या सर्व जमिनीवर दरसाल १८,००० रुपयें खंड भरावा लागतो, परंतु ती सर्व जमीन उंसाचे लागवडी-खालीं आणतां येणें अशक्य होतें, म्हणून सिंडिकेटनें भुइमूग, कपास, इत्यादि तींत पेरून उत्पन्न केलें व जमीनहि सुधारली. २२ डिसेंबर, १९३७ रोजीं सरकार व सिंडिकेट ह्यांचेमधील पाणीपुरवठ्याचा करार रजिस्टर करण्यांत आला. सरकारनें सिंडिकेटसाठीं ऊंस लावण्याकरितां ८,४६२ एकर, २४ गुंठे जमीन मंजूर केली व दरसाल १,२५० एकर उंसास पाणी देण्याचें पत्करलें. १९३७–३८ असेर सिंडिकेटची सर्व मशिनरी दाखल झाली व तिची पूर्ण किंमत सिंडिकेटनें देऊन टाकली, त्यामुळें डिस्कौंटचे सुमारें २ हजार रुपये मिळून ३ हजारांवर व्याजहि वाचलें. ३० नोव्हेंबर १९३८ असेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ३,२४,५११ रुपये झालें. मुदतीच्या ठेवी सुमारें ७ लक्ष रुपयांच्या होत्या.

### साखर तयार झाली

मार्च, १९३९ मध्यें कंपनीच्या फॅक्टरीच्या व मशिनरीच्या उभारणीचें काम पुरें झालें व १७ मार्च रोजीं ऊंस गाळण्यास प्रारंभ झाला. ऊंस गाळण्याचें काम मोसमअसेर चालू होतें. एकूण ४०७ एकरांतील ऊंस गाळण्यांत आला. साखरेस ३० सप्टेंबर, १९३९ असेर मागणीहि चांगली आली. १५३८ एकरांत ऊंस लावलेला होता. अहवालाचे वर्षअसेरच्या हिशेबावरून असें दिसतें, कीं सिंडिकेटला साखर व गूळ ह्यांच्या विक्रीपासून ४,५५,२६२ रुपये मिळाले. कंपनीनें ४३,८९४ रुपये एक्साइज पट्टी भरली. नफ्यांतून प्रेफरन्स व ऑर्डिनरी भागीदारांस अनुक्रमें ५% व ३% डिव्हिडंड मिळाले. वर्षअसेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ४,३३,१५२ रुपये झालें.

### २ लक्ष, ८३ हजार रुपये नफा

१ ऑक्टोबर, १९३९ ते ३० सप्टेंबर, १९४० ह्या वर्षाचा ताजा रिपोर्ट भागीदारांच्या ता. २२ डिसेंबर, १९४० च्या सभेंत मंजुरीसाठीं येईल. ३० सप्टेंबर असेर कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ६ लक्ष रुपये झालें व मुदतीच्या ठेवींची रकम १९ लक्ष, ६५ हजारांवर झाली. सिंडिकेटला साखर व गूळ विक्रीचे १५ लक्ष, ८९ हजार रुपये मिळाले, त्यांतून सर्व खर्च भागवून, ७२ हजार रुपये घसारा काढून सुमारें २½ लक्ष रुपये एक्साइज ड्यूटी देऊन व मॅनेजिंग एजंट यांचें कमिशन वजा घालून २,८३,१७२ रुपये ताळेबंदांत नफ्यासाठीं दाखविण्यांत आले आहेत. तिचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत यावा, अशी बोर्डाची शिफारस आहे:—

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| (१) ता. ३० सप्टेंबर १९४० रोजपर्यंत, | | | |
| १. प्रेफरन्स शेअरवरील वसूल झालेल्या भांडवलावर दरसाल दरशेंकडा ५ प्रमाणें वाटणेसाठीं तरतूद | ६,००० | ० | ० |
| २. ऑर्डिनरी शेअरवरील ३० सप्टेंबर १९४० पर्यंत वसूल झालेल्या भांडवलावर दरसाल दरशेंकडा ६ प्रमाणें डिव्हिडंड वाटणेसाठीं तरतूद | ३०,००० | ० | ० |
| (२) करांची रकम भरणेसाठीं तरतूद | १,७७,५०० | ० | ० |
| (३) शेअर–विक्रीसाठीं यावें लागलेलें कमिशन (राइट ऑफ) खर्च खातीं लिहून टाकणेकरितां | २४,५४१ | १ | ९ |
| (४) डिफर्ड रेव्हिन्यू एक्स्पेंडिचर कमी करणेसाठीं | ४५,१३० | १४ | ११ |
| एकूण रु. | २,८३,१७२ | ० | ८ |

जमीन–सुधारणा वगैरेकरितां झालेल्या खर्चापैकीं दरवर्षी उंसाच्या लागवडीवर योग्य रकम खर्ची टाकून राइट ऑफ करावी, ह्या गतवर्षाच्या अहवालांत खुलासा केलेल्या धोरणानुसार अहवालाच्या सालीं रु. ११,४६० उंसाच्या लागवडीवर खर्ची टाकले आहेत. कराच्या तरतुदीपैकी उरेल त्या रकमेचा विनियोग डिफर्ड रेव्हेन्यू खर्चाची बाकी रकम लिहून टाकण्याकडे करून नंतर डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड निर्माण करण्याकडे करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे.

ता. ३० सप्टेंबर १९४० रोजीं उभें असलेलें उंसाचें पीक एकर १७०५, गुंठे २० आहे. यापैकीं एकर ११५०, गुंठे २० सन १९४०–४१ च्या गाळीतांकरितां व एकर ८३ नवीन लागणीकरितां उपयोगांत आणलें जाईल व एकर ४७२ (अडसाली व अडसाली खोडवा) सन १९४१–४२ करितां पुढें राखून ठेवण्यांत येईल.

---

### बँकिंगविषयक कायदा तहकूब

बँकिंगविषयक विस्तृत कायद्याचा मसुदा तयार करण्याचें काम रिझर्व्ह बँकेनें किमान सहा महिने तरी तहकूब केलें आहे. एकंदर परिस्थिति पूर्ववत येईपर्यंत इतक्या महत्त्वाचा व दीर्घ-परिणामी कायदा करण्याची घाई करूं नये, ह्या हेतूनें ही तहकुबी करण्यांत येत आहे.

### कॉफीची निर्गत व विक्री ह्यांचें नियंत्रण

हिंदी कॉफीची किंमत फार खालीं जाऊं नये, ह्याकरितां सरकारनें केलेल्या योजनेची माहिती अर्थाच्या मागल्या अंकांत देण्यांत आली होती. ह्यासंबंधांतील सरकारी ऑर्डिनन्स आतां प्रसिद्ध झाला आहे.

### उत्तर हिंदुस्थानांतील साखरेच्या धंद्यांतील अडचणी

संयुक्त प्रांत आणि बहार येथील साखरेच्या धंद्यांच्या अडचणी अजून दूर झालेल्या नाहींत. त्यांचा प्रतिकूल परिणाम हिंदुस्थानाच्या इतर भागांतील धंदेवाल्यांवर होत असल्यानें ह्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागणें सर्वांच्याच दृष्टीनें श्रेयस्कर आहे. गेल्या हंगामाच्या उत्पादनापैकीं सुमारें चार लक्ष टन साखर शिल्लक राहिल्यामुळें चालू हंगामाच्या उत्पादनाचें काय करावयाचें आणि ऊस व साखर ह्यांच्या किंमती नुकसानकारक रीतीनें खालीं पडूं न देण्यास कोणते उपाय योजावयाचे ह्या विषयींची चर्चा आज कित्येक महिने चालली आहे. प्रस्तुत प्रश्नांत ऊस पिकवणारे व तो कारखान्यांस विकणारे शेतकरी, गुळासाठीं ऊस देणारे व गूळ तयार करणारे लोक, जुन्या पद्धतीनें साखर बनवणारे खंडकारी, आधुनिक पद्धतीनें साखर करणारे कारखानदार, साखर घाऊक विकणारे व्यापारी, शेतकरी व गुळाचा धंदा ह्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करूं इच्छिणारीं प्रांतिक सरकारें व साखरेचीं गिऱ्हाइकें ह्या सर्वांचा निरनिराळ्या बाजूंचा विचार होऊन त्यांचा मेळ लावला जाणें अगत्याचें आहे. गिरण्यांस ऊस विकणाऱ्या शेतकऱ्यांस त्यांच्या मालाची वाजवी किंमत मिळाली पाहिजे म्हणून संयुक्तप्रांत व बहार येथील सरकारांनीं ह्या बाबतींतल्या नियंत्रणाचे अधिकार स्वतःच्या हातीं घेतले आहेत. उसाची किंमत चढवली कीं साखरेचा भाव वर जातो आणि उसाच्या लागवडीचा विस्तार होतो. कारखाने मर्यादित प्रमाणांत ऊस विकत घेत असल्यानें शिल्लकी उसापासून जुन्या पद्धतीनें साखर किंवा गूळ बनवणें आवश्यक होतें. साखर व गूळ ह्यांच्या किंमती ज्यादा उत्पादनानें घटतात आणि हे धंदे नुकसानींत येतात. घाऊक व्यापाऱ्यांची अशी तक्रार आहे कीं गिरणीवाले साखरेचे भाव उतरवतात आणि त्यांत वारंवार बदल करतात आणि त्या योगानें बाजारांत गोंधळ माजतो. गिरण्यांनीं पुरेसा ऊस खरीदला नाहीं आणि गुळास चांगला भाव आला नाहीं म्हणजे शेतकऱ्यांचा माल पडून राहून वाया जातो आणि ते अडचणींत पडतात. ह्या संबंधांत कांहींतरी तजवीज करणें सरकारास प्राप्त आहे. ह्या रीतीनें उत्तर हिंदुस्थानांत ऊस, साखर व गूळ ह्यांच्या संबंधांतील धंद्यांत विलक्षण गुंतागुंत झाली आहे, आणि ती सोडवावी कशी ह्याचें सर्वांस कोडें पडलें आहे. तें उकलण्यासाठीं सर्व हितसंबंधी लोकांचे प्रतिनिधी व सरकारी अधिकारी ह्यांची पाटणा येथें एक परिषद नुकतीच भरली होती. तीमध्यें झालेल्या चर्चेच्या अनुषंगानें संयुक्त प्रांत व बिहार येथील सरकारें विशिष्ट योजना आतां निश्चित करतील.

---

### इंपिरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची शुगर कमिटी

वरील कमिटीवर पश्चिम हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखानदारांचे प्रतिनिधि, म्हणून प्रो. वा. गो. काळे यांची नेमणूक झालेली आहे. हिंदी साखरेच्या धंद्यासंबंधीं तज्ञ सल्ला देण्याचें काम ही प्रातिनिधिक समिती करीत असते.

### डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन

महाराष्ट्रांतील साखर कारखानदारांची ही संस्था असून, महाराष्ट्रांतील कारखानदारांच्या हितसंबंधांचें रक्षण ती करण्याचा यत्न करते. एकमेकांमधील स्पर्धा शक्य तोंवर टाळून सामुदायिक हितसंवर्धन करणें, हें तिचें काम आहे.

### अमेरिकेंत हिंदी मालाचा उठाव करतां येईल काय ?

युरोपंतील बाजारपेठ हिंदी मालास बंद झाली आहे, तेव्हां अमेरिकेंत हिंदी मालाचा उठाव कसा करतां येईल ह्यासंबंधीं चौकशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें डॉ. ग्रेगरी व सर डेव्हिड मीक ह्यांस जुलै, १९४० मध्यें अमेरिकेला पाठविलें होतें. त्यांनीं आपला रिपोर्ट हिंदुस्थानसरकारला ऑक्टोबर, १९४०मध्यें सादर केला, तो आतां प्रसिद्ध करण्यांत आला आहे. "१९३८मध्यें अमेरिकेंत आर्थिक मंदी होती, ती आतां दूर होत आली आहे. युद्धविषयक मालाची मोठी मागणी व त्यामुळें उद्योगधंद्यास येणारी अपेक्षित तेजी हीं लक्षांत घेतां अमेरिकेचें वार्षिक उत्पन्न वाढल्याविना रहाणार नाहीं, हें उघड आहे. ह्या परिस्थितींत अमेरिकेची आयात केवळ पूर्वीप्रमाणें चालू राहून भागणार नाहीं; ती आणखी वाढली पाहिजे. त्याचप्रमाणें, युद्धविषयक मालास आवश्यक असणारा कच्चा मालहि अमेरिकेस बाहेरून अधिकाधिक आणावा लागेल. हिंदुस्थानानें अमेरिकेकडे माल पाठविण्यासंबंधीं विचार करतांना त्याच्या वहातुकीचा प्रश्न दृष्टीआड करून भागणार नाहीं. कांहीं प्रकारच्या हिंदी तयार मालासंबंधीं अमेरिकेंत कुतूहल आहे व जपानविषयीं तेथें प्रतिकूल मत निर्माण झालें आहे, त्याचा फायदा हिंदुस्थानास मिळेल हिंदी मालाची घाऊक प्रमाणावर विक्री करण्याची व माल हरतऱ्हेचा करण्याची, नमुन्याबरहुकूम तो बनविण्याची, ऑर्डरबरहुकूम तो तत्परतेनें देण्याची विशेष व्यवस्था झाली पाहिजे. हिंदी व्यापारी अमेरिकेस वरचेवर भेटी देऊं लागतील, तर हिंदी माल तेथें खपणें अधिक सुलभ होईल. हिंदी मालाचा प्रसार करण्यासाठी प्रचाराचीहि आवश्यकता आहे. कांहीं प्रकारच्या मालाची अमेरिकेची खरेदी वाढणें शक्य असलें, तरी युरोपांतील बाजारपेठ नाहींशी झाल्यामुळें हिंदुस्थानचें नुकसान अमेरिकेंत भरून येणें शक्य नाहीं. जो माल पूर्वी युरोपांत खपत होता, तसला माल प्रत्यक्ष अमेरिकेंतच होत असल्यास हिंदी मालाची त्याच्याशी स्पर्धा करतां येणार नाहीं. कांहीं प्रकारच्या हिंदी मालास तेथें युद्धविषयक मागणी आहे, कांहीं माल तेथें स्पर्धा करून खपवावा लागेल व कांहीं माल विकण्यासाठी विशेष प्रयत्न करावा लागेल अशा तीन गटांत हिंदी मालाची वर्गवारी करतां येईल."

---

### किती ऊस कारखान्यांत गाळला जातो ?

प्रत्येक प्रांतांतील एकूण उसाच्या पिकापैकीं शेकडा किती ऊस कारखान्यांत गाळला गेला, हें खालील तक्ता दर्शवितो. विशेषतः बिहारमध्यें ऊस लावणाऱ्या शेतकऱ्यांचें साखरकारखान्यांवरील अवलंबन अतिशय मोठें आहे, हें त्यावरून समजून येईल. त्या प्रांतांतील कांहीं जिल्ह्यांतील ६० ते ७०% ऊस कारखान्यांत गाळला जातो.

| संयुक्त प्रांत | बिहार | मुंबई | सबंद हिंदुस्थान |
|---|---|---|---|
| १६.९ | ४३.१ | १४.० | १७.८ |

---

### गुळाचें प्रमुख प्रांतांतील उत्पादन
(१९३७–३८)

| | टन |
|---|---|
| संयुक्त प्रांत | १८,७५,००० |
| बंगाल | ३,७७,००० |
| पंजाब | २,७१,००० |
| मुंबई | १,७९,००० |
| मद्रास | १,७८,००० |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ४२,००० |

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन (१९५५–६०) | ११२—९ |
| ४% १९४३ | १०४—९ |
| ३½% बिनमुदत | ९४—० |
| ३½% १९४७–५० | १०२—२ |
| ३% (१९६३–६५) | ९३—० |
| २½% १९४८–५२ | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) | ११८—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाव

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १३७—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०३–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ४०—४ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १५८५—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% | १३०—८ |
| कराची (१००) ९% | २२३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% | ९८—० |
| पाचोरा–जामनेर (१००) १½% | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९५—० |
| तापी व्हॅली (५००) ८% | ७०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २१९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ४५–१२ |
| शिंदा स्टीम (१५) १ रु. | २०—२ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. | ४०—२ |
| ओरिएंटल विमा (२००) ३२५ रु. | ३६००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २१०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३९९—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १८८०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | ११७—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (गिनि) प्रत्येक तोळ्यास | ४१-१३-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६१-१२-६ |

## बी. बी. अँड सी. आय. ची व्यवस्था सरकारकडे जाणार

१ जानेवारी, १९४२ पासून बी.बी. अँड सी.आय.रेल्वे कंपनी व आसाम बेंगॉल रेल्वे कंपनी यांची व्यवस्था हिंदुस्थान सरकार स्वतःकडे घेणार आहे. बी. बी. अँड सी. आय. चे मुख्य फाटे अनुक्रमें १०३५ मैल व १८७९ मैल लांबीचे आहेत. व ते अनुक्रमें ५'६" व ३' ३⅜" गेजचे आहेत. बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या एकूण ७५ कोटि रुपयांच्या भांडवलापैकी ९०% भांडवलाची मालकी आजच हिंदुस्थान सरकाराची आहे. ही रेल्वे चालविण्यास घेण्यासाठी सरकारनें रेल्वे कंपनीस २¾ कोटि रुपये दिले म्हणजे पुरे होतील. रेल्वे कंपनीचीं १३ कोटि रुपयांचीं ३½% दराचीं डिबेंचर्स आहेत, तीं मात्र सरकार तूर्त फेडणार नाहीं. त्यांची मुदत भरल्यानंतर त्याचे पैसे दिले जातील. आसाम बेंगॉल रेल्वेच्या २५ कोटि रुपयांच्या भांडवलापैकी २३ कोटि रुपये सरकारचे आहेत. तेव्हां ती रेल्वे कंपनी ताब्यांत घेण्यास २ कोटि रुपये पुरतील. पेटलाद–कैंबे, धागंध्रा, पालनपूर स्टेट, पिपलोद–देवगढ–बारिया, राजपिपला स्टेट, इत्यादि संस्थानी मालकीच्या रेल्वेजचा कारभारहि बी. बी. अँड सी. आय. कडेच आहे. तापी व्हॅली, अहमदाबाद–प्रांतज, चंपानेर–शिवराजपूर, गोध्रा–लुनावडा, इत्यादि रेल्वेजची व्यवस्था रीबेट पद्धतीनें बी. बी. अँड सी. आय. पहाते. आसाम बेंगॉल रेल्वेचा मुख्य फाटा ३' ३⅜" गेजचा १,१३२ मैल लांब आहे. १७४ मैलांच्या तीन रेल्वेजची व्यवस्था आसाम बेंगॉलकडे आहे.


पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

OUR HOME

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक

निवास भोजनालयांत

उतरण्यास या.

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं


अनुभवास येतील.

अवर होम,

११९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचें तेल
डोकें थंड रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ल्हेक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को. (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

**For Collegians**
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**
*Work-Shop Address:* 153 Kasaba. Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.